माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

## अपील क्रमांक : १८६७/२०१८

**अपीलकर्ता**, श्री. मनीष रुपराव जवंजाळ,
मु. पो. देवलापार, ता. रामटेक, जि. नागपूर-४४१४०८.

**जन माहिती अधिकारी तथा तलाठी, देवलापार, तहसिल कार्यालय, रामटेक ता. रामटेक, जि. नागपूर.**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी, देवलापार, तहसिल कार्यालय, रामटेक ता. रामटेक, जि. नागपूर.**

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.०८.२०१८**

**अपीलकर्ता** : उपस्थित
**जन माहिती अधिकारी** : उपस्थित
**प्रथम अपीलीय अधिकारी** : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ११.०४.२०१८ | १७.०४.२०१८ | ०२.०५.२०१८ | निरंक |

अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये दिनांक ११.०४.२०१८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज सादर केला आहे. सदर अर्जान्वये त्यांनी "प.ह. नं. २९, मौजा- देवलापार, तह. रामटेक येथील गाव नमुना याची सत्यप्रत मिळण्याबाबत एकूण ६ मुद्दयांवर" माहिती मागितलेली आहे.

अपीलकृर्ता यांनी आयोगाकडे दिनांक २५.०६.२०१८ रोजीच्या अर्जान्वये "माहिती न मिळाल्यामुळे " असे कारण नमुद करून व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपील अर्जाच्या अनुषंगाने आज दिनांक ०६.०८.२०१८ रोजी सुनावणी घेण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान अपीलकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा तलाठी, श्री. ठाकुर व प्रथम अपीलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी, श्री. अनिल लक्ष्मणजी भगत उपस्थित आहेत.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

द्वितीय अपील अर्जाच्या सुनावणी दरम्यान अपीलकर्ता यांनी आयोगासमक्ष कथन केले की, माहिती अधिकारी यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने गाव नमुना बाबतची माहिती मागितलेली असता त्यांनी गाव नमुना बाबतची माहिती ही आवश्यक विवरणास मागविण्यात यावी, असे कळवून माहिती दिलेली नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले असता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अद्यापपर्यंत प्रथम अपीलाची दखल घेतलेली नाही. त्यामुळे आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही खातेदारांशी संबंधीत असल्यामुळे अपीलार्थी संबंधीत जागेविषयी किंवा सर्व्हे क्रमांक विषयी आवश्यक असलेली माहिती मागणी करावी, असे अपीलकर्ता यांना कळविले. तसेच गाव नमुना ही वैयक्तीक असल्यामुळे अपीलार्थीस माहिती दिलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्ता यांनी माहिती अर्जात गाव नमुना बाबतची माहिती मागितलेली आहे. तथापि, सदर माहिती ही सार्वजनिक दस्ताऐवज असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती पुरविलेली नाही. तसेच अपीलार्थीस सदर माहिती करीता आवश्यक विवरणास मागविण्यात यावे, असे कळविले. आज रोजी सुनावणी दरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस २-३ दिवसात माहिती उपलब्ध करुन देतो, अशी आयोगासमक्ष हमी दिली. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात अपीलार्थीस माहिती अर्जात नमुद असलेल्या गाव नमुना बाबतची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी व त्याची पोच आयोगास सादर करावी, असे आदेशीत करुन प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजेच ३० दिवसात अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षीत होते. तथापि, जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपीलार्थीस माहिती न दिल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केला असे निदर्शनास येत असल्याने त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) अन्वये शास्ती का करु नये? याचा खुलासा आयोगास सादर करावा. त्यांनी खुलासा सादर न केल्यास आयोग त्यावर एकतर्फी निर्णय घेईल.

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर अपील अर्जाच्या अनुषंगाने ४५ दिवसात सुनावणी घेऊन आदेश पारीत करणे अपेक्षित आहे. परंतू प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलीय अर्जावर सुनावणी घेतलेली नसल्याचे निदर्शनास येत असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (६) चा भंग केलेला आहे. त्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन दिनांक १०

जून, २००८ रोजीचे परिपत्रक व कलम १९ (८) (ग) व २० (२) अन्वये शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करु नये? याचा खुलासा आयोगास सादर करावा.

अत: आयागाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाप्रमाणे प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**(दिलीप ल. धारुरकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नागपूर**

**नागपूर**
**दिनांक** ०६.०८.२०१८

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग
सत्यमेव जयते
नागपूर

**जा.क्र.**-9279-----**दि.**------------ 3 OCT 2018

Desktop/kavita/ Joshi/1867/2018